**श्री.अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात..**

दुरध्वनी क्र. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.टेनन्सी/अपील/१९८/२०२२

दिनांक-३१.०१.२०२५

प्रति,

१. चंद्रकांत बबन साळुंखे
२. केराबाई बाबू पुजारी
३. दिलीप मारूती गुरूव
४. कृष्णाबाई तुकाराम खामकर म.वा
४/१. ज्ञानू तुकाराम खामकर
४/२. पांडूरंग तुकाराम खामकर म.वा
४/२/१. फुलाबाई पांडूरंग खामकर
४/२/२. नागेश पांडूरंग खामकर
४/२/३. अर्चना अविनाश पाटील
४/३. बाळू तुकाराम खामकर
४/४. सुसाबाई बाबू वाघमोडे
४/५. रंगा तुकाराम खामकर
५. निलाबाई सदाशिव गलांडे म.वा
शोभा सदाशिव गलांडे
६. मोहन बजरंग सुतार
७. सुनिता दिलीप सुतार
८. मोहन रामा कोळी
९. तानाजी बाबू माने

नं.३,५,६,७,८ व ९ तर्फे कुलमुखत्यारधारक श्रीनिवास धोंडीबा पाटील रा.जत ता.जत जि.सांगली
नं. १, ४/१, ४/२/१, ४/२/२, व ४/३, ८ रा.दुधाळ वस्ती, जत ता.जत.जि. सांगली
नं.४/२/३ रा.कंठी, ता.जत, जि. सांगली
नं. २, ४/४ रा. प्रतापूर, ता.जत, जि. सांगली
नं. ३, ४/५ रा.अलकुड-एस ता. क.महांकाळ जि. सांगली
नं.५ रा. करजगी, ता.जत जि. सांगली
नं.६ रा.गायकवाड प्लॉट, डफळापूर ता.जत जि. सांगली
नं.७ रा. बाज ता.जत जि. सांगली
नं.९ रा. रेवनाळ ता.जत जि. सांगली .... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. बकुळाबाई वसंतराव देशपांडे म.वा
गितांजली गोविंद गंगातीकर
रा. देशिंग, ता.क.महांकाळ जि. सांगली ...... **जाबदार**

**महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ७४**

**निकालपत्र**

तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण जत यांनी क्र.ए.एल.टी/एसआर/०८/२०२२ दिनांक २५.११.२०२२ प्रकरणी दिलेल्या निर्णयावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी सदरचे आरटीएस अपील दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपीलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली आहे.**

**अपिलार्थी यांनी आपले लेखी युक्तिवादामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. वाद मिळकत अपिलार्थी यांची स्वसंपादित मिळकत आहे. सदर मिळकतीत अपिलार्थी हे कुळ अथवा मुळ मालक नसुन अपिलार्थी यांना सदर वाद मिळकत तहसिलदार यांच्या आदेशाने फे.नं. २२२ ने दिः ०१/०३/१९८७ च्या हुकमावरुन ग.नं. ४५०/२/१ यास महाराष्ट्र शासन असे नाव दाखल केले व श्रीमती. बकुळाबाई देशपांडे यांचे नाव कमी करुन नियंत्रित शासन सत्ता प्रकार कुळ कायदा कलम ४३ शर्तीस असा शेरा मारुन सदर मिळकत महाराष्ट्र शासन यांचेकडे जमा केली. त्यानंतर दिनांक १७/०४/१९८९ रोजीचे कब्जेपटटीवरुन फे.नं.२६९ ने सदर ग.नं. ४५०/२/१ चे कब्जेपटटी प्रमाणे अपिलार्थी यांना ८ वेगवेगळे हिस्से निर्माण करुन. त्यांचा स्वतंत्र गट नंबर तयार केला. अश्याप्रमाणे सदर अपिलार्थी यांचे नाव फे.नं.२६९ ने दि.

१७/४/१९८९ रोजी नोंद झाले. सदर मिळकत महाराष्ट्र शासन यांचेकडुन योग्य ती किमंत भरणा करुन निविदा काढुन उपलब्ध झालेली मिळकत असुन सन १९८९ सालापासुन आजतागायत सदर वाद मिळकत अपिलार्थी यांची शातंतामय पध्दतीने कब्जेवहिवाटीत होती व आहे. तसे ७/१२ उतारे अपिलार्थी यांनी हजर केले आहेत. अपिलार्थी हे वाद मिळकतीचे कायदेशीर मालक आहेत.

२. तहसिलदार, जत यांनी अपिलार्थी यांचा गेल्या ३३ वर्षापासुन असलेला कब्जा वहिवाट व ७/१२ उताऱ्यांच्या मालक सदरी असणाऱ्या नोंदी बाबत कोणतीच शहानिशाह न करता मुळात १२ वर्षापेक्षा जास्त कालावधी पासुन विरुध्द कब्जाने जरी एखादी मिळकत ताब्यात असेल तर सदर व्यक्ती सदर मिळकतीचा विरुध्द कब्जाने जरी एखादी मिळकत ताब्यात असेल तर सदर व्यक्ति सदर मिळकतीचा विरुध्द कब्जाने मालक होतो. असे असताना अपिलार्थी यांनी शासनाकडे योग्य ती किमंत जमा करुन ३३ वर्षापुर्वी जास्त कालावधी पासुन अपिलार्थी यांच्या कब्जेवहिवाटीत असतातना अपिलार्थी यांना त्यांची बाजु मांडणेची कोणतीही संधी न देता सदर मा. तहसिलदार सो, जतत यांनी ए.एल.टी.एस.आर/८/२०22 चे कामी दिं. १७/११/२०22 रोजी चुकीचा व गैरन्यायिक न्यायनिर्णय केलेला असुन. सदरचा न्यायनिर्णय रदद बातल होणेस पात्र आहे. सदर कामी अपिलार्थी पैकी काही अपिलार्थी यांना नोटीस बजावणी झालेली नव्हती, शिवाय काही अपिलार्थी हे मयत असताना त्याची पुर्तता झालेली नसताना. तरी देखील सदरचा एकतर्फा न्यायनिर्णय दिलेला आहे. सदरचा न्याय निर्णय हा कायदयातील तरतुदीच्या बाहेर जावुन तहसिलदार यांनी स्वताच्या अधिकाराचा गैरवापर करुन अपिलार्थी यांना त्यांची बाजु मांडणेची संधी न देता दिलेला आहे तो चुकीचा व बेकायदेशीर असल्याने सदरचा आदेश रदद बातल होणेस पात्र आहे.

३. प्रस्तुत कामी अपिलार्थी यांनी एम.आर.टी. यांनी दिलेल्या न्यायनिर्णया वरती मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे कोर्टात रिट पिटीशन दा खल केलेले असुन ते सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

४. मुळ स.नं.१०१, १०२, १०३ याचा बदलेला ग.नं.४४९/२ क्षेत्र २४ हे ५२ आर आकार २५.०० रु.पै. यामध्ये पुन्हा झालेला बदल त्याचे क्षेत्र २३ हे २४ आर आकार २३ रु ४३ पै. सदरचा गट हा मुळ मालक श्रीमती. बकुळाबाई वसंतराव देशपांडे (मयत) यांच्या मालकीचा होता. सदरची मालकीन दि- ०१/०४/१९५७ पुर्वीची विधवा असल्यामुळे तिला कुळ कायदयामध्ये अधिकार नसल्याने किंवा कुळाची जमीन खरेदी करणेचा अधिकार नसल्यामुळे तिचा खरेदीचा हक्क पुढे ढकलला त्यावेळेचे सदर मिळकती वरचे तिथे कुळ कोंडिबा वगरे हे होते. सदर संपुर्ण मिळकती पैकी कुळांनी म्हणजे कोंडिबा वगरे यांनी उत्तरेकडील आर्धा हिस्सा खरेदी करुन मागितला त्यांचे क्षेत्र ११ हे ५७ आर असे होते. यातील मुळ मालक बकुळाबाई देशपांडे व कुळ कोंडिबा वगरे यांचे आपसात तडजोड होऊन कुळांनी उत्तरेकडील आर्धा हिस्सा खरेदी घेतला त्यावेळी उर्वरित दक्षिणेकडील ११ हे ५७ आरचा हिस्सा कुळांनी म्हणजे कोंडिबा वगरे यांनी खरेदी घेण्यास नकार दिला. त्यांनी असमर्थता दर्शविली. त्यामुळे सदरची जमीन शासन जमा करण्यात आली. त्यानंतर शासनाकडुन निविदा निघाल्यानतरसदरचे अपेलंट यांनी सदर मिळकत मिळणे करिता तहसिलदार यांचकेडे निविदेप्रमाणे पात्र उमेदवार म्हणुन अर्ज दाखल केला. त्यावेळी पात्र उमेदवार म्हणुन अपेलंट यांनी शासनाच्या आदेशा प्रमाणे सदर मिळकतीची किमंत शासन दरबारी भरुन रितसर सदर मिळकतीचे मालक यातील अपिलार्थी हे झाले आहेत. त्यामुळे कुळ कायदा ३२ (पी) (२) (बी) प्रमाणे अपिलार्थी हे सदर मिळकतीचे खरेदीने मालक झाले आहेत. सदर आदेश झाल्यानंतर मुदत संपल्यानंतर जाबदार यांनी अपिलार्थी यांना पक्षकार न करता टेनन्सी अपिल नं १/१९८९ चे उपविभागीय अधिकारी मिरज यांचेकडे दाखल केले. सदर उपविभागीय अधिकारी यांनी दिः ३१/१२/१९८९ रोजी आदेश करुन टेनन्सी अपिल मंजुर केले. त्यावरती प्रस्तुत अपिलार्थी

यांनी एम.आर.टी कोल्हापुर या कोर्टात रिव्हिजन दाखल केले. सदर कामी अपिलार्थी यांचे रिव्हिजन मंजुर करून सदरचे काम एस. डी. ओ. मिरज यांचेकडे फेर तपासणी साठी पाठविण्यात आले.

५. कुळ कायदा कलम ३२ प (२) (ब) मधील तरतुदः- जमीन मालक बकुळाबाई हिने दिः-१३/०३/१९८५ रोजी तहसिलदार यांचेकडे अर्ज दिला व कुळांना निम्मी जमीन खरेदी दयावी अशी विनंती केली. त्याप्रमाणे अप्पर तहसिलदार जत यांनी डिसेबर १९८६ रोजी निर्णय देवुन सदरचे वाद मिळकती पैकी दक्षिण बाजुची मिळकत कुळांना र.रु९३६.८०/- यास खरेदी दिली. उत्तर बाजुची निम्मी जमीन हि कुळ कायदा कलम ३२ प (२) (ब) मध्ये दिले तरतुदी प्रमाणे सदरची मिळकत जमीन मुळ मालक यांना देता येत नसलेमुळे व मुळ मालक यांनी नको असलेबाबत जबाब दिला असल्यामुळे सदरची जमीन सरकार जमा करणेबाबत कारवाई करणेत आली. कुळ कायदा कलम ३२ प (२) (ब) पाहता कलम १५ च्या उपबंधास अधिन राहुन १५ (२) मध्ये कलम ३१ ते ३२ अ यात कुळ वहिवाट समाप्त करणे संदर्भात ज्या शर्ती निर्दीष्ट केल्या आहेत त्यास अधिन राहुन कुळातील जमीनीचा कब्जा देण्याची पात्रता ठरविणेचे बंधन आहे. कलम ३१(३) (दोन) अन्वये विधवा स्त्रीयाचे उत्तराधिकारी यांनी ज्या तारखेस विधवा स्त्रीयाचे जमीनीतील हित संबधं संपतील किंवा नष्ट होतील त्या तारखेपासुन (१) वर्षाचे आत नोटीस देवुन कलम २९ (अ) प्रमाणे अर्ज करून कब्जा मिळविण्याची तरतुद आहे. विधवा स्त्रियाचे हयातीपर्यंत मुंबई कुळ वहिवाट व शेत जमीन अधिनियम १९४८ कलम ३१ व ३१ ते कलम ३२ र यांचे उपबंध लागु होत नाहीत. त्यामुळे बकुळाबाई मुळ मालक यांना निम्मी जमिनीचा कब्जा मागणी करता येणार नाही. त्यामुळे त्यांची मागणी हि मान्य करता येत नसलेमुळे दि.१२/१९८६: चे आदेशाने उत्तर बाजुची निम्मी जमीन सरकार जमा करणेचा निर्णय दिला व तो दि.०३/०३/१९८७ रोजी तलाठयास आदेश देवुन फे.नं.२२२/१९८७ दि.२०/०६/१९८७ ने निम्मी जमीन सरकारात घेवुन स्वतंत्र ७/१२ तयार केला. पर्यायाने जमीन वाटप करणेस उपलब्ध झाली. तहसिलदार यांनी कुळ कायदा कलम ३२ प (२) (ब) अन्वये नियम २१ अन्वये नमुना ११ मध्ये जाहिर नोटीस काढुन जमीन मागणीचे अर्ज मागविलेव पात्र लोकांना म्हणजे वादी यांना नियम २१ (२) (क) अन्वये दि.०१/०२/१९८९ चे आदेशाने जमीन वाटप करुन दि.१०/०४/१९८९ रोजी संबधितांना प्रत्यक्ष कब्जे देवुन रेकॉर्ड दुरुस्त केले आहे.

६. प्रस्तुत अपिलार्थी हे भुमिहीन होते त्यांनी सदरची मिळकत शासनाच्या नियमानुसार जाहिर नोटीसीप्रमाणे दिलेल्या गरजु व्यक्तीचे निविदा मागविल्या त्याप्रमाणे ३१ व्यक्तिचे अर्ज दाखल झाले त्या मधुन योग्य निवीदांचे सर्व नियमांचे पालन व छाननी करुन केवळ पात्र ८ व्यक्तिची निवड केली. त्याप्रमाणे योग्य तो मोबदला शासन जमा केल्यानंतरच सदरची मिळकत अपिलार्थी यांना शासनाने मोजणी करुन मे. तहसिलदार सो, यांनी प्रत्यक्ष कब्जा करून अपिलार्थी यांना दिला आहे. तेव्हा पासुन म्हणजे गेली ३३ वर्षापासुन अपिलार्थी यांचा सदर मिळकतीत प्रत्यक्ष कब्जा आहे. त्यामुळे आता सदरच्या मिळकतती अपिलार्थी यांचेकडुन घेता येणार नाहीत. तसे जर झाले तर अपिलार्थी यांचे वरती फार मोठा अन्याय होणार आहे.

**जाबदार यांनी आपले लेखी युक्तिवादामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. मौजे कंठी ता. जत येथील गट नं ४५०/२/१ क्षेत्र ११ हे २७ आर ची मिळकत मुळ मालक बकुळाबाई वसंतराव देशपांडे ईचे मालकिची आहे. तिचे कुळ म्हणुन कोंडिबा ज्ञानु वगरे व राधु विठोबा वगरे होते. ती तारीख ०१.०४.१९५७ रोजी विधवा होती यामुळे अॅडीशनल मामलेदार यांनी मुं कु वहिवाट का. क. ३२ (जी) प्रमाणे ची कारवाई पुढे ढकलली यामुळे कुळ असणारे कोंडीबा ज्ञानु वगरे व राधु विठोबा वगरे हे मालक होऊ शकले नाहीत.

२. पुढे १९८५/८६ मध्ये मुळ मालक बकुळाबाई वसंतराव देशपांडे व कुळ कोंडिबा वगरे व राधु वगरे यांनी तडजोडीचा अर्ज दाखल करुन त्या अर्जात आठ आणे जमीन कुळास व आठ आणे जमीन जमीनमालकास देणेत यावी अशी विनंती केली त्यानुसार ॲडशिनल तहसिलदार जत यांनी १९८६ डिसेंबर मध्ये दक्षिणेकडील आठ आणेची जमीन कुळांना रु ९३६.८० पैसे ची एका हप्त्यात भरुन घेणेचा हुकुम केला व उर्वरित उत्तरेकडील आठ आणेची जमीन सरकार जमा केली यामुळे ता ०२.०६.१९८७ रोजी मुळ मालकीण बकुळाबाई वसंतराव देशपांडे ईने ॲडशिनल तहसिलदार जत यांना अर्ज करुन तिचे उदर निर्वाहचे एकमेव साधन उत्तरेकडील आठ आणेची असलेली मिळकत असुन ती तिला देण्याचा हुकुम व्हावा अशी विनंती आहे. परंतु सदरचा अर्ज मंजुर केला अथवा नामंजुर केला याबाबत हुकुम न करता ॲडशिनल तहसिलदार जत यांनी तारीख १९.०१.१९८९ रोजी अपिलार्थी व त्यांचे पुर्वाधिकारी यांना कब्जा दिला अशी बतावणी करुन ता १०.०४.१९८९ रोजी जमीनीची विल्हे केली असे दाखविले आहे. तथापी याप्रमाणे प्रत्यक्षात कब्जा देण्याचा प्रकार झालेला नाही यास्त्व बकुळाबाई देशपांडे ईने उपविभागीय अधिकारी यांचे कडे प्रस्तुत हुकुमबाबत अपील क्र ०१/१९८९ चे दाखल केले उपविभागीय आधिकारीसो मिरज यांनी ॲडशिनल तहसिलदार जत यांनी दिलेला हुकुम ता ३१.१२.१९८९ रोजी रद्द केला व ३२ (पी) खाली स्वतंत्र्यपणे चौकशी करण्याचे निर्देश दिले. या निकालावर नाराज होऊन अपिलार्थी यांनी एम आर टी कडे अपील केले व या निकालात ही पुन्हा चौकशीचे आदेश दिलेने उपविभागीय अधिकारी यांनी रि. अर्ज नं ०२/२००० चा थरुन ता २८.०२.२००१ रोजी तहसिलदार जत यांनी दिलेले हुकुम रद्द करुन ३२ (पी) प्रमाणे कारवाई करणेत यावी, असा आदेश दिला या निकालावर नाराज होऊन अपिलार्थी यांनी पुन्हा एम आर टी कडे रि अर्ज नं एस एस/३०/बी२००२ चा दाखल केला यामध्ये ता ३१.०८.२०१७ रोजी रिव्हीजन अर्ज नामंजुर करत मे एम आर टी यांनी उपविभागीय अधिकारी मिरज यांनी दिलेला निकाल काही अंशी तबदिल करत तहसिलदार जत यांना ३२ (पी) प्रमाणे स्वतंत्र्य कारवाई करण्याचे आदेश दिले व नं कंठी /३२पी/२(के)/६१/६२ ता ०१.०२.१९८९ मधील निकाल रद्द केल्याचा आदेश आहे तसा ठेवला.

३. निकालावर अपिलार्थी यांनी मा. ना उच्च न्यायालय मुंबई यांचेकडे अपील केले नाही अथवा या मे एम आर टी यांचे निकालास आजपर्यंत स्थगीती दिलेली नाही. यामुळे मे एम आर टी यांचे तारिख ३१.०८.२०१७ रोजीचे निकालाप्रमाणे तहसिलदार यांनी क्र ए एल टी/एस आर /०८/२०२२ दिनांक २५/११/२०२२ ३२ प (२) (ब) प्रमाणे कारवाई करीत मुळ मालकीण बकुलाबाई देशपांडे ईची वारस म्हणुन गितांजली गोविंद गंगातीरकर ईचे नांव उत्तरेकडील गट नं ४५०/२/१ क्षेत्र ११ हे ५७ आर यास दाखल करण्याची कार्यवाही करण्यात यावी असा आदेश दिला या निकालावर प्रस्तुतचे अपिल दाखल केले आहे.

४. प्रस्तुतचे अपिल खोटे, लबाडीचे असुन मे. एम आर टी यांनी एकदा दिलेल्या अंतिम निकालाप्रमाणे तहसिलदार जत यांनी क्र ए एल टी/एस आर/०८/२०२२ चा निकाल दिला असुन तो बरोबर आहे. वास्तविक पाहता मुळ जमीन मालकीण बकुळाबाई देशपांडे ईने तिचे हयातीत १९८६ सालीच स्वतंत्र्यपणे जमीनीतील आठ आणे चा हिस्सा तहसिलदार जत यांना आपले नांवे करणेचा अर्ज दिला होता. त्यावर हुकुम करणे ऐवजी तो अर्ज तसाच ठेवुन तहसिलदार जत यांनी अपिलार्थी यांना गट नं ४५०/२/१ क्षेत्र ११ हे ५७ आर क्षेत्राची जाहीर लिलावाने वाटप केलेचे कागदोपत्री दाखविले आहे. तदनंतर अपिलार्थी यांनी रे. दि. मु. नं/१९९४ चा केला होता या कामी अपिलार्थी यांना गट नं ४५०/२/१ चे मिळकतीचे कब्जे वहिवाटीस हरकत, अडथळा करु नये अशी ताकीद ही दिल आहे. या निकालावर अपिलार्थी यांनी कोठेही अपील दाखल केलेले नाही. यामुळे रे दी मु नं १९४ मधील निकाल अपिलार्थी वर बंधनकारक आहे.

५. अपिलार्थी अपील कलम १२ मध्ये नमुद केलेला मजकुर धादांत खोटा, लबाडीचा आहे मौजे हरोली येथील मिळकतीचा व मौजे कंठी येथील मिळकतीचा काहीही संबंध नाही गट नं ४५०/२/१ ची जमीन कुळांना व गांवातील इतर लोकांना खरेदी करणेची आहे. या बाबत कोणताही ठोस पुरावा नाही. याउलट अपिलार्थी हे बाहेरगांवातील इसम आहेत ते कधीच कंठी येथे आले नाहीत (पहा अपील मेमोत नमुद अपिलार्थी यांचे नांवासमोरील पत्ते) कुलमुखत्यार घेणारा हा मौजे कंठी येथील कायमचा रहिवासी असुन तो गट नं ४५०/२/१ चा संपुर्ण खरेदी करण्याचा त्याचा मानस असलेने त्याने सर्वांचे मुखत्यारपत्र घेतले आहे. अपील मेमो कलम १३ मधील निम्मी जमीन मागणी केली उर्वरित निम्मी जमीन आम्हाला नको असे लिहुन दिलेमुळे त्यांना आता या अर्जात सामील होता येणार नाही. या मजकुराचा या अपीलाशी संबंध नाही कुळांनी अपीलाकामी हजर होणेचा अर्ज ही दिलेला नाही.

६. अपिलार्थी यांनी अपिल मेमो चे कलम १४ मध्ये लिहिलेला मजकुर खोटा लबाडीचा आहे निविदा मागविल्या ३१ व्यक्तीचे अर्ज दाखल याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा नाही ८ व्यक्तींचे निवड केलेबाबत ही कागदोपत्री पुरावा नाही तसेच गेले ३० वर्षापासुनचा कब्जा असलेचाही पुरावा नाही. कारण रे दि मु नं/१९९४ चा निकालावर अपील नसलेने ते त्यांचेवर बधंनकारक आहे.

७. अपिलार्थी यांनी अपिल मेमो कलम १६ मध्ये लिहीलेला मजकुर खोटा, लबाडीचा आहे. मुळात गट नं ४५०/२/१ ची जमीन कुळांनी परत मागीतलेली नाही. यामुळे याबाबतचा सर्व मजकुर खोटा, लबाडीचा व बेकायदेशीर आहे. मे एम आर टी / एस एस/ ३०/बी/२००२ मधील दिलेला निर्णय योग्य असुन या निर्णया प्रमाणे च तहसिलदार जत यांनी क्र ए एल टी / एस आर/०८/२०२२ मधील दिलेला निर्णय योग्य आहे. प्रस्तुतचे अपील नामंजुर करून तहसिलदार जत यांचे आदेशाप्रमाणे म्हणजेच मे. एम आर टी पुणे यांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे गट नं ४५०/२/१ चे ७/१२ सदरी जाबदार गितांजली गोविंद गंगातीरकर यांचे नांव लावणेचा हुकुम व्हावा.

**अपिलार्थी यांनी प्रकरणी दाखल केलेला अपील मेमो, जाबदार यांचा लेखी युक्तिवाद, प्रकरणी उपलब्ध दाखल कागदपत्रे यांचे एकत्रित अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. वाद मिळकतीसंदर्भात मा.सदस्य (न्यायिक), महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण कॅम्प पुणे यांनी क्र.एमआरटी/एसएस/३०/बी/२००२ निकाल ता.३१०८.२०१७ अन्वये रिव्हीजन अर्ज फेटाळण्यात येवून जप्त केलेल्या जमिनीची तहसिलदार यांनी, ३२ पी(२)(२) खाली विल्हेवाट लावणेत यावी एवढयापुरती उपविभीय अधिकारी, मिरज यांचेकडील टेनन्सी रिव्हीजन नं.०२/२००० दिनांक २८.०२.२००१ मधील आदेशात सुधारणा केली आहे व उर्वरित आदेश म्हणजे अपर तहसिलदार जत यांचेकडील केस नं.कंठी/३२/पी/२सी/६१/६२ दिनांक २५.११.१९८८ व नं.कंठी/३२पी/२(के)६१/६२ दिनांक ०१.०२.१९८९ चा आदेश रद्द केलेबाबतचा आदेश कायम केलेला आहे. या मा.सदस्य (न्यायिक), महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण कॅम्प पुणे यांचे आदेशानुसार तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण जत यांनी क्र.ए.एल.टी/एसआर/०८/२०२२, दिनांक २५.११.२०२२ रोजी दिलेल्या आदेशावर व्यथित होऊन प्रस्तूतचे टेनन्सी अपिल दाखल केले आहे.

२. वाद मिळकती संदर्भात महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ३२ग प्रमाणे काम चालले असता जमीन मालक अर्जदार यांचे पुर्वहक्कदार बकुळाबाई वसंतराव देशपांडे व कुळे कोंडीबा ज्ञानू वगरे व राघू विठोबा वगरे यांचेमध्ये तडजोड होऊन कुळाने अर्धी जमीन खरेदी घेण्याचे ठरविले त्याप्रमाणे अपर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण जत यांनी निम्या जमिनीची किंमत ठरविणेत आले व उर्वरित निम्मी जमीन महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ३२-पी (२)(बी)

प्रमाणे जमीन मालकांना जमीन देण्याबाबतचा आदेश करण्याऐवजी सदरची जमीन शासन जमा करणेचा आदेश केलेला होता. त्याबाबत उपविभागीय अधिकारी मिरज व मा.सदस्य (न्यायिक), महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण कॅम्प कोल्हापूर यांचेकडे कामकाज चालून शेतजमीन न्यायाधिकरण तथा तहसिलदार जत यांची कुळांनी खरेदी करून राहीलेली निम्मी जमीन जमीनमालक अर्जदार यांचे पुर्वहक्कदार देशपांडे यांना न देता शासन जमा करण्याची कार्यवाही केलेली पुर्णपणे चुकीची व बेकायदेशीर आहे व त्याप्रमाणे वाटप केले ते चुकीचे आहे. त्याबाबत अंतिमरित्या मा.सदस्य (न्यायिक), महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण कॅम्प पुणे यांनी क्र.एमआरटी/एसएस/३०/बी/२००२ निकाल ता.३१.०८.२०१७ रोजी निर्णय दिलेला आहे व त्या निर्णयाआधारे तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण जत यांनी क्र.ए.एल.टी/एसआर/०८/२०२२, दिनांक २५.११.२०२२ रोजी दिलेला आदेश योग्य व कायदेशीर आहे. त्यामुळे सदरच्या आदेशामध्ये कोणत्याही प्रकारचे बदल करणे जरूरी वाटत नाही.

३. वाद मिळकतीसंदर्भात सांगली येथील मे.सिव्हील जज्ज सिनियर डिव्हीजन सो, सांगली यांचे न्यायालयात स्पे.दी.मु.नं.७७/२०२३ याप्रमाणे दावे न्यायप्रविष्ठ आहेत. सदर दाव्यातील अंतिम निर्णय अपिलार्थी व जाबदार यांचेवर बंधनकारक असणार असून त्यानुसार अधिकार अभिलेख सदरी नोंदी होणार आहेत. एकंदरीतच उपरोक्त विवेचनाअंती मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे. तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण, जत यांचेकडील क्र.ए.एल.टी/एसआर/०८/२०२२, दिनांक २५.११.२०२२ चा आदेश न्यायालयाचे निर्णयास अधिन राहून कायम करण्यात येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर आदेशाचा अंमल अपिलकालावधी नंतर करणेत यावा.

सदर निकालाची समज सर्व संबंधीताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

( अजयकुमार नष्टे)
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण - जत
दिनांक -३१.०१.२०२५

प्रत- तहसिलदार जत यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.